**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४६९/२०२५ मधील निशाणी क्र.०१ वरील आदेश**

(आदेश पारीत दिनांक – ०७.०४.२०२६)

रिहानाबी व इतर वि. निरंक

CNR No.MHLA060024202025

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन अधिनियम,१८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदाराचे संक्षिप्त कथन असे की, नामे दस्तगीर महेताब कुमठेकर यांचा दिनांक १८.०६.२०२५ रोजी लातूर, ता. जि.लातूर, येथे आजारपणामुळे मृत्यू झाला आहे. (तद्नंतर 'दस्तगीर महेताब कुमठेकर' यांना वाक्यांची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने 'मयत दस्तगीर' असे संबोधण्यात येईल). मयत दस्तगीर यांचे समयीचे कायदेशीर वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | नांव | मयताशी नातेसंबंध |
|---|---|---|
| १. | रिहानाबी भ्र. दस्तगीर कुमठेकर | पत्नी |
| २. | सत्तार पि. दस्तगीर शेख | मुलगा |
| ३. | गफार पि. दस्तगीर कुमठेकर | मुलगा |
| ४. | शकिल पि. दस्तगीर खूरेशी | मुलगा |
| ५. | अकबर पि. दस्तगीर शेख | मुलगा |
| ६. | लतिफ पि. दस्तगीर कुरेशी | मुलगा |
| ७. | मुकरम पि. दस्तगीर खुरेशी | मुलगा |
| ८. | रज्ज़ाक पि. दस्तगीर कुरेशी | मुलगा |

०३. अर्जदाराचे कथन असे की, वरील वारसदारां व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदाराने मयताच्या मृत्यू पश्चात त्यांच्या नांवे असलेल्या स्थावर व जंगम मालमत्ता मयताचे कायदेशीर वारसदारांच्या नावे हस्तांतरण करणेकामी व इतरही शासकीय आणि निमशासकीय कार्यालयीन कामकाजासाठी प्रस्तुतचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केला आहे.

०४. दि बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे नियम १ चे तरतुदीनुसार न्यायालयाचे मान्यतेने मयत व्यक्तीचे कायदेशीर वारस हे सक्षमपणे प्रतिनिधीत्व करु शकतात. नियम २ चे तरतुदीनुसार न्यायालयाने वारस, मृत्युपत्र व्यवस्थापक किंवा प्रशासक यांना त्यांचे हक्क मान्य करण्यासाठी त्यांनी दाखल केलेल्या अर्जावरुन जाहीर प्रगटनानंतर एक महिन्यांचे आत अर्जदाराचे हक्काबाबत आक्षेप घेण्यासाठी त्यांचे आक्षेप नोंदविणे गरजेचे असते. नियम ७ चा दुसरा भाग हा असे विदित करतो की, सदरचे प्रमाणपत्र हे कोणत्याही मिळकतीवरील हक्क निश्चित करीत नसुन, ते फक्त सद्य परिस्थितीवरील कायदेशीर व्यवस्था व्यक्तीचे वारसासाठी दर्शविते. तसेच अशाप्रकारे मंजूर केलेले प्रमाणपत्र अंतिमत: हक्क निर्णित करीत नाही किंवा इतरांचे हक्कास इजा/हानी पोहोचवित नाही.

०५. अर्ज दाखल झाल्यानंतर दिवाणी न्यायालय क.स्तर, तहसिल कार्यालय व पंचायत समिती कार्यालय व ग्राम पंचायत कार्यालय, कुमठा (बु.) यांचे नोटीस बोर्डवर जाहिरनामा (निशाणी क्र.७) प्रसिध्द करण्यात आला. अर्जदाराच्या विनंतीस कोणाचा आक्षेप आहे काय ? याबाबत न्यायालयाच्या आदेशान्वये अर्जदाराने दिनांक २०.०७.२०२५ रोजी ''दैनिक प्रतिव्यवहार'' वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रगटन (निशाणी १४) प्रसिध्द करण्यात आले. परंतु आजतागायत सदर प्रकरणामध्ये कोणाचाही आक्षेप/उजर प्राप्त झाला नाही.

०६. प्रस्तुत अर्जातील कथनांच्या पुष्ठयर्थ अर्जदाराने (निशाणी १०) अन्वये अकबर पि. दस्तगीर शेख यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. तसेच अर्जदाराने त्यांच्या स्वत:च्या आधार कार्डची सत्यप्रत दाखल केलेली आहे. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्याने त्याच्या प्रतिज्ञापत्रात अर्जातील कथनांचा तंतोतंत समावेश केला आहे. कथनांची पुनरावृत्ती टाळण्याच्या हेतूने त्याच्या प्रतिज्ञापत्रातील कथने याठिकाणी मांडण्याची आवश्यकता नाही. शिवाय अर्जदाराने निबंधक (जन्म आणि मृत्यु) लातूर शहर महानगरपालिका लातूर यांनी निर्गमित केलेले मयताचे मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी १२) व वारसाबाबत स्वयंघोषणापत्र (निशाणी १३) वर दाखल केले आहेत. सदर मृत्यूपत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये मयत दस्तगीर यांचा दिनांक १८.०६.२०२५ रोजी लातूर ता.जि. लातूर येथे मृत्यु झाल्याचे दिसून येते. तसेच वारसाबाबत स्वयंघोषणापत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अर्जदार व वरील नमूद वारस हे मयत दस्तगीर यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. तद्नंतर अर्जदाराने (निशाणी १७) अन्वये पुरसिस सादर करुन त्याचा पुरावा बंद केला. अर्जदाराने नि.२० कडे अकबर दस्तगीर शेख आणि सत्तार दस्तगीर शेख

यांच्या नावाचे महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन नाव, वय व धर्म बदलण्याच्या जाहिरात प्रत दाखल केली आहे. त्यानुसार त्यांचे नाव अकबर दस्तगीर शेख आणि सत्तार दस्तगीर शेख केल्याबाबत किंवा असल्याबाबत कुणीही आक्षेप घेतलेला नाही. सदरच्या अर्जात अर्जदाराची आडनावे वेगवेगळे का झाले आहेत याबाबत अर्जदाराने (निशाणी १६) शपथपत्र दाखल केलेले आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार क्र. २ व ५ यांचे कागदोपत्री आडनाव शेख असे झालेले असल्यामुळे सदर अर्जामध्ये त्यांचे कागदोपत्री नावाप्रमाणे नाव नमुद करण्यात आलेले आहे. तसेच अर्जदार क्र. ४,६,७ व ८ यांचे कागदोपत्री त्यांच्या वडीलोपार्जित व्यवसायावरुन नजरचुकीने खुरेशी असे लागले आहे. त्यामुळे त्यांचे सदर मुळ अर्जावर कागदोपत्री नावाप्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे. सर्व वारसदाराचे वडील नामे दस्तगीर महेताब कुमठेकर असे आहे. (निशाणी २१) कडे मयत दस्तगीर महेताब कुमठेकर यांची पत्नी रिहानाबी दस्तगीर कुमठेकर हिने शपथपत्र दाखल केले आहे की, सदर अर्जातील अर्जदार क्र.२ ते ८ ही तिचीच अपत्ये असुन सदर अपत्ये ही मयत दस्तगीर महेताब कुमठेकर यांच्यापासुनच झालेली आहेत आणि अर्जदार क्र. २ ते ८ हे तिचे मुले असुन दस्तगीर महेताब कुमठेकर यांचे वारस आहेत.

०७. अर्जदाराच्या पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही. त्यामुळे अर्जातील कथनावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही. अभिलेखाचे अवलोकन करता तसेच अद्याप कोणाचा आक्षेप नसल्यामुळे मयत यास अर्जदार व वरील नमूद वारस हे मयत दस्तगीर यांचे कायदेशीर वारस असल्याचे ग्राहय धरण्यास हरकत नाही.

०८ अर्जदारांचे आडनाव मयत व्यक्तीच्या आडनावपेक्षा वेगळे असल्याचे नोंदीत दिसुन येते. तथापि मृत व्यक्तीची पत्नी जी स्वत: अर्जदार आहे हिने न्यायालयासमोर दिलेल्या शपथपत्राद्वारे अर्जदार क्र. २ ते ८ हे मयताचे मुले असल्याचे स्पष्टपणे नमुद केल आहे. तसेच अर्जदाराने व्यवसायाच्या कारणास्तव आपले आडनाव बदलले असल्याचे त्यांनी शपथपत्रात सांगितलेले आहे. उपरोक्त बाबी सादर केलेले कागदपत्र व नोंदी याचा विचार करता न्यायालयाच्या समाधानास येते की, अर्जदार हे मयत व्यक्तीचे कायदेशीर वारस आहेत.

०९ तथापि हे स्पष्ट करण्यात येते की, या आदेशाअधारे कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या नोंदीत अर्जदारांची नावे समाविष्ठ करणे अथवा इतर कोणतेही नोंद करणे हे संबंधित प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रात येते. संबंधित प्राधिकरणाने त्यांच्या प्रचलित नियम व कायद्यानुसार स्वतंत्रपणे निर्णय घ्यावा. न्यायालयाचा हा आदेश त्याबाबतीत बंधनकारक राहणार नाही. उपरोक्त विश्लेषणाअंती अर्जदार याचे मयताशी असलेले नातेसंबंध विचारात घेता

अर्जदार व वरील नमूद वारस हे मयत दस्तगीर यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येते.

२. अर्जदार नामे ०१. रिहानाबी भ्र. दस्तगीर कुमठेकर ०२. सत्तार पि. दस्तगीर शेख, ०३. गफार पि. दस्तगीर कुमठेकर, ०४. शकिल पि. दस्तगीर खुरेशी व ०५. अकबर पि. दस्तगीर शेख, ०६. लतिफ पि. दस्तगीर कुरेशी, ०७.मुकरम पि. दस्तगीर खुरेशी व ०८. रज्ज़ाक पि. दस्तगीर कुरेशी सर्व रा. कुमठा (बु.), ता.अहमदपूर, जि.लातूर, अर्जदार क्र.०३, ०४ व ०५ ह.मु. शिरुर ताजबंद, ता.अहमदपूर, जि.लातूर हे मयत दस्तगीर महेताब कुमठेकर रा. कुमठा (बु.), ता.अहमदपूर जि.लातूर यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करण्यात येते व सदरचा वारसा दाखला हा अर्जदारास देण्यात येते.

३. दिवाणी पुस्तिका प्रकरण क्र.१४ मधील परिच्छेद क्रमांक ३१२ अन्वये मूळ वारस प्रमाणपत्रावर टिप नमूद करावी.

४. अर्जदाराने आवश्यक ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमित करावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर).

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2026.04.07 17:47:01 +0530

स्थळ :- अहमदपूर.
दिनांक :- ०७.०४.२०२६.

(एम.सी. हासगे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
अहमदपूर.